**पंतप्रधानांनी रशियाच्या राष्ट्राध्यक्षांची घेतली भेट (01 सप्टेंबर 2025)**

01 सप्टेंबर 2025

चीनच्या टियांजिनमध्ये शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज रशियाचे राष्ट्राध्यक्ष महामहिम श्री. व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली.

2. नेत्यांनी आर्थिक, वित्तीय आणि ऊर्जा क्षेत्रासह द्विपक्षीय सहकार्यावर चर्चा केली आणि या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय संबंधांमध्ये शाश्वत वाढीबाबत समाधान व्यक्त केले.

3. दोन्ही नेत्यांनी युक्रेनशी संबंधित नवीनतम घडामोडींसह प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर देखील चर्चा केली. युक्रेनमधील संघर्ष सोडवण्यासाठी अलीकडेच केलेल्या पुढाकारांना पंतप्रधानांनी आपल्या समर्थनाचा पुनरुच्चार केला आणि संघर्ष त्वरित थांबवण्याच्या आणि शाश्वत शांतता तोडगा काढण्याच्या गरजेवर भर दिला.

4. दोन्ही नेत्यांनी उभय देशांदरम्यान विशेष आणि विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्या पाठिंब्याची पुष्टी केली. पंतप्रधानांनी राष्ट्रपती पुतिन यांना सांगितले की, या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या 23 व्या वार्षिक शिखर परिषदेसाठी त्यांचे भारतात स्वागत करण्यासाठी ते उत्सुक आहेत.

टियांजिन

01 सप्टेंबर 2025